# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## जाहीर निवेदन

मार्च -एप्रिल -२०२२ उन्हाळी परीक्षा अनुषंगाने विद्यापीठ परीक्षा पद्धती बाबत विविध संघटना ,विद्यार्थी लोकप्रतिनिधी यांच्या कडून निवेदन प्राप्त झाली होती. या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने, अधिकार मंडळाचे मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेकरिता विधी व अभियांत्रिकी पदवी स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये प्रवेश उशिरा झालेने व या अभ्यासक्रमाच्या परीक्षा अद्यापी सुरु झाले नसल्याने व इतर सर्व शैक्षणिक बाबीचा विचार करून उच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरणाच्या निर्णयाच्या अधीन राहून विधी व अभियांत्रिकी पदवीस्तरावरील परीक्षा ऑफलाईन MCQ पद्धतीने घेण्याचे निश्चित केले आहे. यामुळे सदरच्या अभ्यासक्रमाच्या **पदवी स्तरावरील** पूर्वनियोजित परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत. विधी व अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सपूंर्ण अभ्यासक्रमांवर, ५० गुणांची, एक तास कालावधीची, ऑफलाईन MCQ पद्धतीने होईल. याशिवाय अन्य पदवी स्तरावरील सर्व अभ्यासक्रमांच्या पदवी,पदव्युत्तर,पदविका व प्रमाणपत्रे इत्यादी परीक्षा यापूर्वी घेण्यात आलेल्या निर्णयानुसार ऑफलाईन वर्णनात्मक (Descriptive) पद्धतीने म्हणजेच कोव्हीड-१९ पूर्व परिस्थितीमध्ये घेण्यात येत असलेल्या पारंपरिक पद्धतीने होतील. या पारंपरिक वर्णनात्मक (Descriptive) परीक्षा करीता शासन निर्देशानुसार प्रश्नसंचिका उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत / येत आहेत. तसेच दोन पेपर मध्ये दोन दिवसाचे अंतर नियमित विद्यार्थ्यांकरिता व १५ मिनिटे प्रतितास वाढीव वेळेचीमुभा देण्यात येणार आहे. तथापी विधी व अभियांत्रिकी स्तरावरील ऑफलाईन MCQ पद्धतीने होणाऱ्या परीक्षेसाठी प्रश्नपेढी (question bank) उपलब्ध असणार नाही. तसेच वाढीव कालावधी व दोन पेपर मधील अंतर हि मुभा असणार नाही याची सर्व विद्यार्थी, महाविद्यालये व इतर भागधारक यांनी नोंद घ्यावी.

सबब, विधी व अभियांत्रिकी परीक्षांचे बदललेले वेळापत्रक अथवा त्या संदर्भातील निर्णय विद्यापीठ संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येतील. याबाबत विद्यार्थांनी शिवाजी विद्यापीठ च्या अधीकृत संकेतस्थळावर भेट द्यावी. यासंदर्भात सोशल मिडिया वरील अपुऱ्या / चुकीच्या दिशाभूल देण्याऱ्या माहिती पासून सावध रहावे.

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Scanned with CamScanner